DAY —— 20 SEAT NUMBER

| 2022 | III | 28 | 1500 | J-873 | (M) |
|---|---|---|---|---|---|

# HISTORY (38)

Time : 3 Hrs. (8 Pages) Max. Marks : 80

*सूचना : (१) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.*
*(२) उजव्या बाजूस गुण दर्शविलेले आहेत.*
*(३) उत्तरपत्रिकेमध्ये आकृत्या पेनानेच काढाव्यात.*
*(४) प्रत्येक प्रश्नाचे उत्तर नवीन पानांवर लिहावे.*

**प्र. १.** **(अ)** दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पूर्ण विधाने पुन्हा लिहा : (६) [१०]

(१) इ.स. १६०९ मध्ये ------- यांनी सुधारित दुर्बीण तयार केली

(अ) जॉन के (ब) कोपर्निकस

(क) गॅलिलिओ (ड) केपलर

(२) अमेरिकन स्वातंत्र्याचा जाहीरनामा ------- यांनी तयार केला.

(अ) जॉर्ज वॉशिंग्टन (ब) थॉमस जेफरसन

(क) लॉर्ड ॲमहर्स्ट (ड) लॉर्ड कॉर्नवॉलिस

(३) आर्य समाजाची स्थापना ------- यांनी केली.

(अ) राजा राममोहन रॉय (ब) स्वामी दयानंद सरस्वती

(क) रामस्वामी नायकर (ड) महात्मा फुले

(४) इंग्लंडच्या ------- यांनी ईस्ट इंडिया कंपनीला पूर्वेकडील देशांशी व्यापार करण्याचा परवाना दिला.

(अ) सर जॉर्ज ऑक्झिंडेन (ब) राजकन्या ब्रॅगांझा

(क) एलिझाबेथ राणी (ड) चार्ल्स

(५) स्वामी विवेकानंद यांचा जन्मदिन ------- म्हणून साजरा केला जातो.

(अ) राष्ट्रीय शिक्षण दिन (ब) राष्ट्रीय एकात्मता दिन

(क) राष्ट्रीय युवक दिन (ड) राष्ट्रीय विज्ञान दिन

(६) 'एर्नाकुलम' हा पहिला १०० टक्के साक्षर झालेला जिल्हा ------ राज्यात आहे.

(अ) केरळ (ब) गुजरात

(क) कर्नाटक (ड) तमिळनाडू

**(ब)** पुढील प्रत्येक संचातील 'ब' गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा : **(४)**

(१)

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| (i) | जॉन के | — | धावता धोटा |
| (ii) | सॅम्युएल क्रॉम्प्टन | — | कॉटन जीन |
| (iii) | एडमंड कार्टराईट | — | यंत्रमाग |
| (iv) | जेम्स वॅट | — | स्टीम इंजिन |

(२)

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| (i) | टोगोलँड | — | जर्मन वसाहत |
| (ii) | इजिप्त | — | ब्रिटिश वसाहत |
| (iii) | ऑरेंज फ्री स्टेट | — | डच वसाहत |
| (iv) | आयव्हरी कोस्ट | — | पोर्तुगीज वसाहत |

(३)

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| (i) | अमेरिका | — | वुड्रो विल्सन |
| (ii) | इंग्लंड | — | विन्स्टन चर्चिल |
| (iii) | जर्मनी | — | हिटलर |
| (iv) | इटली | — | लिनलिथगो |

(४)

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| (i) | भारतीय कृषी संशोधन परिषद | — | कृषी विज्ञान केंद्रांना प्रोत्साहन देणे |
| (ii) | फाजल अली आयोग | — | प्रदूषण नियंत्रण आयोग |

(iii) जागतिक व्यापार संघटना — संपूर्ण जग व्यापारासाठी खुले करणे

(iv) भारतीय विज्ञान काँग्रेस संस्था — भारतातील वैज्ञानिक वातावरणाला प्रोत्साहन देणे

**प्र. २.** **(अ)** ऐतिहासिक व्यक्ती, ठिकाण, घटना यासंबंधीची नावे लिहा : (४) **[८]**

(१) 'ग्रहमाला पृथ्वीकेंद्रित नसून सूर्यकेंद्रित आहे' असे प्रतिपादन करणारा शास्त्रज्ञ –

(२) १९७५ साली भारतात विलीन झालेले राज्य –

(३) आझाद हिंद सेनेची स्थापना करणारे –

(४) पहिल्या महायुद्धातील इंग्लंड, फ्रान्स, रशिया या राष्ट्रांचा गट –

**(ब)** दिलेल्या कारणांपैकी योग्य कारण निवडून विधाने पूर्ण करा : (४)

(१) दुसऱ्या चार्ल्सने मुंबई बेट ईस्ट इंडिया कंपनीला भाड्याने दिले, कारण

(अ) कंपनीकडून राजाला जास्त भाडे मिळणार होते.

(ब) ईस्ट इंडिया कंपनीला व्यापारासाठी हे बेट हवे होते.

(क) या बेटाच्या कारभारासाठी जेवढा खर्च व्हायचा, त्यामाने उत्पन्न कमी येत होते.

(ड) दुसरा चार्ल्स मुंबईत येऊन स्वत: कारभार करू शकत नव्हता.

(२) जुनागढचा नवाब पाकिस्तानला पळून गेला कारण –

(अ) नवाबाला पाकिस्तामात मोठा प्रदेश मिळणार होता.

(ब) संस्थानी प्रजा त्यांना तुरुंगात कैद करणार होती.

(क) संस्थानातील प्रजेचा नवाबावर विश्वास नव्हता.

(ड) संस्थानी प्रजेने त्याच्या निर्णयाला विरोध करून आंदोलन उभे केले होते.

(३) स्वतंत्र भारताने ग्रामीण विकासाच्या अनेक योजना सुरू केल्या कारण –

(अ) ग्रामीण भाग विकसित होत नव्हता.

(ब) ग्रामीण भागाच्या विकासाची गती मंद होती.

(क) शहरे व ग्रामीण भाग यांत विकासाचा असमतोल निर्माण होऊ नये यासाठी.

(ड) ग्रामीण भागाच्या विकासाची आतापर्यंत गरज नव्हती.

(४) दिल्लीतील सर्व सार्वजनिक वाहनांमध्ये सीएनजीचा वापर करण्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला कारण -


(अ) सीएनजीचा वापर करणे सर्वांसाठी सुलभ होते.

(ब) पेट्रोल वा डीझेलपेक्षा सीएनजी सहज उपलब्ध आहे.

(क) सेंटर फॉर सायन्स अँड एन्व्हायरनमेंट संस्थेने प्रदूषणावर उपाय म्हणून ही शिफारस केली होती.

(ड) दिल्लीतील सार्वजनिक वाहनांची संख्या कमी आहे.

प्र. ३. (अ) पुढील नकाशाचे निरीक्षणकरून प्रश्नांची उत्तरे लिहा : (५) [१३]




(१) भारताच्या पूर्व किनारपट्टीवर फ्रेंचांनी कोठे वसाहत स्थापन केली?

(२) नागपूर येथे कोणाची सत्ता होती?

(३) भारताच्या पश्चिम किनारपट्टीवरील इंग्रजांची वखार कोठे होती?

(४) भारताच्या पश्चिम किनारपट्टीवर गोवा येथे कोणाची वसाहत होती?

(५) ग्वालियर येथे कोणाची सत्ता होती?

**(ब)** दिलेली संकल्पनाचित्रे पूर्ण करा (कोणतीही चार) : (८)

(१) साम्राज्यवादाच्या वाढीची कारणे

- ---------
- ---------
- ---------
- ---------


(२) युरोपीय वसाहतवादाशी संबंधित कालरेषा पूर्ण करा :

| | | | |
|---|---|---|---|
| ३१ डिसेंबर १६०० | ------ | इ. स. १६६४ | ------ |
| ------ | युनायटेड ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना | ------ | फ्रेंचांची सुरत येथे पहिली वखार स्थापन |


(३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरू केलेली वृत्तपत्रे

- ....................
- ....................
- ....................
- ....................


(४)


सातारच्या प्रतिसरकारने केलेली जनहिताची कामे
---------
---------
---------
---------

(५)


सदस्य राष्ट्रांमधील आर्थिक विषमता
1
2
---------
3
दळणवळणाच्या अपुऱ्या सोई
4
---------
5
वाढता दहशतवाद
6
---------
7
भिन्न राज्यपद्धती
8
---------
सार्क समोरील आव्हाने

(६)


भारतीय चिकित्सा पद्धती
------
------
------
------

प्र. ४. (अ) पुढील विषयांवर संक्षिप्त टिपा लिहा (कोणत्याही तीन) : (६) [१५]

(१) युरोपातील धर्मयुद्धे

(२) अमेरिकन स्वातंत्र्ययुद्ध

(३) पोर्तुगीजांची युद्धनीती

(४) प्रार्थना समाज

(५) भारत सरकारचे युवक धोरण

(ब) पुढील विधाने सकारण स्पष्ट करा (कोणतीही तीन) : (९)

(१) औद्योगिक क्रांतीची सुरुवात सर्वप्रथम इंग्लंडमध्ये झाली.

(२) राजर्षी शाहू महाराजांची धोरणे पुरोगामी होती.

(३) हैदराबाद संस्थान भारतात विलीन झाले.

(४) भारताला दोन्ही महायुद्धांमध्ये सहभागी व्हावे लागले.

(५) भारतात माहितीचा अधिकार कायदा लागू झाला.

**प्र. ५. खालील विधानांवर तुमचे मत नोंदवा (कोणतेही तीन) :** [९]

(१) पोर्तुगीजांचे भारतातील धोरण असहिष्णू वृत्तीचे होते.

(२) १८५७चे स्वातंत्र्ययुद्ध हे स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या मते ‘भारतीयांचे पहिले स्वातंत्र्ययुद्ध होते.

(३) दुसरे महायुद्ध संपताच निर्वसाहतीकरणास अधिक चालना मिळाली.

(४) भारताने वसाहतवादा विरोधात नेहमीच भूमिका मांडली आहे.

(५) पर्यटनस्थळांची काळजी सर्वांनी घ्यावी.

**प्र. ६. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही दोन) :** [१०]

(१) स्पेनने अमेरिकेत आपल्या वसाहती कश्या निर्माण केल्या?

(२) १९४२च्या भारत छोडो आंदोलनाची माहिती लिहा.

(३) शीतयुद्धाचे परिणाम स्पष्ट करा.

**प्र. ७. खालील प्रश्नांची दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे उत्तरे लिहा ( कोणतेही तीन ) : [१५]**

(१) अफगाण-मराठे संबंध स्पष्ट करा.

(अ) अब्दालीची १७४८ मधील पहिली स्वारी

(ब) अब्दालीची १७५७ मधील तिसरी स्वारी

(क) अब्दालीची १७५९ मधील चौथी स्वारी ( पानिपतचे तिसरे युद्ध)

(२) काश्मीर संस्थानाच्या विलीनीकरणाची माहिती लिहा.

(अ) पाकिस्तानी सीमेवरील सशस्त्र टोळ्यांचे आक्रमण

(ब) सामीलनामा

(क) विलीनीकरण

(३) महायुद्धांचे परिणाम स्पष्ट करा.

(अ) जीवित व वित्त हानी

(ब) भारतीय राष्ट्रीय सभेची भूमिका

(क) इंग्लंडवर झालेले परिणाम

(४) पुढील वसाहतींच्या स्वातंत्र्याविषयी माहिती लिहा.

(अ) मालदीव

(ब) श्रीलंका

(५) देशी बियाणे संवर्धन कार्यात राहीबाई पोपेरे यांच्या कार्याची माहिती लिहा.

(अ) कार्याची सुरुवात

(ब) कार्य

(क) पुरस्कार

◆◆◆